ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०९ फाल्गुन शके १९४७, शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

लाच घेणे हा देशद्रोहच!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय जनता पक्षाच्या एका आमदाराला पाच लाख रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. कर्नाटक लोकायुक्त पोलिसांनी ही मोठी कारवाई केली असून आमदारच अशा प्रकारे लाच घेताना आढळून आल्याने राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.भाजप आमदाराच्या लाच प्रकरणाने परत एकदा लाच घेण्याचा आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे .

लाच घेणे हा केवळ वैयक्तिक नैतिक गुन्हा नसून तो थेट देशाच्या विकास, अर्थव्यवस्था आणि प्रशासनावर केलेला हल्ला आहे, त्यामुळे तो एकप्रकारचा देशद्रोह मानला जातो. भ्रष्टाचाराच्या या कृत्यामुळे लोकांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडतो आणि देशाची सुरक्षा व प्रतिष्ठा धोक्यात येते. आमदार, असो की खासदार,एखादा अधिकारी हे लोकसेवक असतात. आपल्या सेवेशी बांधील असतात. लाच घेणे म्हणजे जनतेशी व देशाच्या विकासाशी गद्दारी करणेच होय.अशा व्यक्तींवर तात्काळ कारवाई करून त्यांना पदभ्रष्ट करण्याची व कडक शिक्षा करायला पाहिजे.

भारतात भ्रष्टाचार फार मोठ्या प्रमाणावर फोफावला आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यापासून तर वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत लाच घेतल्या जाते.पैसे घेताना घेणाऱ्यांना काहीच वाटत नाही. आपली बदनामी होईल, शिक्षा होईल,चार चौघात नाचक्की होईल,याची थोडी देखील भीती लाच घेणाऱ्यांना वाटत नाही. लाच घेतल्या शिवाय फाईल पुढे सरकतच नाही, मग ती फाईल कोणती का असेना...लाच घेणारा तर दोषी असतोच,मात्र देणारा तितकाच.पण परिस्थिती अशी निर्माण केली जाते की लाच न देणाराही पैसे देऊन काम करून घेतो, न दिल्यास, तृटी नसताना जाणीवपूर्व उणिवा काढून दप्तर दिरंगाई करतात..शेवटी नाईलाजास्तव न देणारा लाच देऊन मोकळा होतो.लाच घेणे कायद्याने गुन्हा असताना देखील लाच घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे.

भारतीय कायद्यानुसार, लाच देणे आणि घेणे हे दोन्ही समान गुन्हे मानले जातात. भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारणा) कायदा, २०१८ या कायद्यातील नवीन बदलांनुसार, आता लाच देणाऱ्यावरही थेट गुन्हा दाखल होऊ शकतो. पूर्वी लाच देणे हा केवळ गुन्ह्याला प्रवृत्त करणे मानला जात असे, परंतु आता तो स्वतंत्र गुन्हा (८) आहे.लाच देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला, दोघांनाही ३ ते ७ वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

अपवाद (संरक्षण):जर एखाद्या व्यक्तीला लाच देण्यासाठी जबरदस्ती केली गेली असेल आणि तिने ही घटना ७ दिवसांच्या आत तपास यंत्रणेला (उदा.) कळवली, तर अशा व्यक्तीवर कारवाई केली जात नाही.

लोकसेवक जेव्हा लाच घेतात, तेव्हा ते जनतेप्रती असलेल्या त्यांच्या निष्ठा आणि कर्तव्याचा विश्वासघात करतात. त्यामुळे

अर्थव्यवस्थेला फटका बसतो. भ्रष्टाचारामुळे देशाच्या आर्थिक विकासात अडथळे येतात आणि विकासकामांचा दर्जा खालावतो, जो देशद्रोहाच्या पातळीवरील गुन्हा ठरतो.

लाच घेणे किंवा देणे हा लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत गंभीर गुन्हा आहे .

त्यामुळे, भ्रष्टाचाराला आळा घालणे म्हणजे देशप्रेमाचे पालन करणे होय.

लाच घेताना पकडलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला ताबडतोब त्यांची मालमत्ता जप्त करून त्यांची नोकरी संपुष्टात आणण्याची शिक्षा द्यायला हवी.भ्रष्ट्राचार करणाऱ्या विरुद्ध कठोर कायदेशीर सुधारणांची आवश्यकता आहे.

लाच घेताना पकडलेल्या कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्यांना केवळ निलंबन किंवा बदलीच नाही तर थेट आणि सक्तीची शिक्षाही झाली पाहिजे.

सर्व बेकायदेशीर मालमत्ता तात्काळ जप्त करणे,सेवेतून कायमची बडतर्फी पेन्शन आणि सरकारी फायदे रद्द करावेत,जलदगती न्यायालयात ६ महिन्यांच्या आत निर्णय, पुन्हा कोणतेही सरकारी पद भूषविण्यास आजीवन अपात्र ठरवणे

जेव्हा एखाद्या सामान्य नागरिकाला किरकोळ चुकीसाठी तुरुंगात जावे लागू शकते,जनतेला लुटणाऱ्या अधिकाऱ्यांना इतकी उदारता का?

लाच घेणे ही ''चूक'' नाही, तर ती देशद्रोह आहे.

भीती नसल्यास भ्रष्टाचार थांबणार नाही.

आता प्रश्न हा नाही की कायदा करता येईल का,

प्रश्न हा आहे की सरकारचा हेतू काय आहे?

भ्रष्टाचारमुक्तभारत

भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहिष्णुता

सर्वांसाठी समान कायदा?

***

विश्व मराठी संमेलनानिमित्त दुमदुमली कुसुमाग्रजांची नगरी

शोभायात्रेत विद्यार्थ्यांसह हजारो नागरिकांचा सहभाग

ज्योतिर्मय साहित्य

नाशिक – मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, परंपरा, मराठी भाषा – अभिजात मराठीचा जागर करीत आणि 'ज्ञानोबा माऊली, तुकाराम'च्या गजराने आज सकाळी कविवर्य कुसुमाग्रजांची नगरी अर्थात नाशिक शहर दुमदुमून निघाले. त्यात भर पडली होती ती लेझीम, ढोल वादनाची. निमित्त होते, चौथे विश्व मराठी संमेलनाचे. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या निवासस्थानापासून आज सकाळी चौथ्या विश्व मराठी संमेलनानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत विद्यार्थ्यांसह हजारो नागरिक सहभागी झाले होते.

महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ किरण कुलकर्णी, सहसचिव डॉ. नामदेव भोसले, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मराठी भाषा विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, जिल्ह्यातील कवी, साहित्यिक यांच्यासह नीलम शिर्के आदी सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते ग्रंथ आणि पालखीचे पूजन करण्यात आले. तसेच मराठी भाषा गौरव दिवस अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

चौथे विश्व मराठी संमेलन मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या कविवर्य कुसुमाग्रज नगरीत होत आहे. यानिमित्त १ मार्च २०२६ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज सकाळी पालखीसह शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पारंपरिक लोककला, नृत्य पथक, बोहाडा पथक, लेझीम, ढोल पथकासह वारकरी दिंडी काढण्यात आली. भव्य-दिव्य अशी विठ्ठलाची मूर्ती, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा मुकुट, बोहाडा पथकातील विविध रूपे नागरिकांचे आकर्षण ठरली होती. कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून निघालेली शोभायात्रा त्र्यंबक रोड, सीबीएस, मेहेर सिग्नल, अशोकस्तंभ मार्गे कविवर्य कुसुमाग्रज नगरीत पोहोचली. तेथे शोभायात्रेचा समारोप झाला. या शोभायात्रेत मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, परंपरा, मराठी भाषा अभिजात मराठीचा जागर करण्यात आला.

अरे संसार संसार ते जागर शिवबाचा! चौथे विश्व मराठी संमेलन

मराठी बोलींच्या महोत्सवाला नाशिककरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य

नाशिक – चौथे विश्व मराठी संमेलन नाशिक येथे होत आहेत. या संमेलनाच्या पूर्वसंध्येला आज महाकवी कालिदास कलामंदिरात मराठी बोलींचा महोत्सव पार पडला. या महोत्सवात 'अरे संसार संसार' पासून ते 'जागर शिवबा' चा पर्यंत बोली भाषेतील कार्यक्रम सादर करण्यात आले. या महोत्सवास नाशिककरांनी भरभरून प्रतिसाद दिला.

चौथे विश्व मराठी संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी बोली भाषांच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त दिवसभर विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. जळगाव येथील परिवर्तन संस्थेने शंभू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बहिणाबाईंची गाणी व कविता यावर आधारित 'अरे संसार संसार' हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देत 'वन्स मोअर'ची मागणी केली. या कार्यक्रमातून अहिराणी गीतांचे दर्शन घडविण्यात आले. तसेच श्री. पाटील यांनी जीवनात बोली भाषेचे महत्व विशद केले.

बोहाडा नृत्य प्रकार नाशिकचे शाहीर प्रवीण जाधव आणि सहकाऱ्यांनी सादर केला.

पुष्पा ठाकूर, राणी कुमावत, माणिक कुमावत आणि सहकाऱ्यांनी अहिराणी गीते, तर विदर्भातील नाट्य प्रकार असलेला 'झाडीपट्टी' हा प्रकार नरेश गडेकर व सहकाऱ्यांनी सादर केला. विशाल शिंगाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'आराधी' लोकनृत्य आणि लोकगीते सादर केली. अखिल भारतीय साहित्य परिषद शाखा, धाराशिव निर्मित आराधी लोकनृत्य आणि लोकगीतांमध्ये श्रीकृष्ण गीत, वासुदेवाचे पहाटेचे भक्ती गीत, विठू माऊली गीत, खंडोबाचा जागर, वाघ्या मुरळी गीत, देवीचा जागर आदी गीते सादर केली.

प्रवीण जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शौर्य गाथा, बालपण, विविध गुणांचा व कार्याचा पैलू दाखवणारे पोवाडा, गीत सादर केले.

या कार्यक्रमांना दिवसभर उपस्थित राहून नाशिककरांनी उत्स्फूर्त दाद दिली.

आजोळ

ज्योतिर्मय साहित्य

आवडते आजोळ, म्हणजे मायेचा मोहोळ प्रत्येक व्यक्तीला लहानपणी तर नक्कीच वाटत असते की, आपल्याला आजी, आजोबा असावेत. आजोबांचे मोठ्ठे घर, आणि त्यामध्ये खूप लाड करणारी आज्जी असावी. आणि मुख्य म्हणजे हे आजोळ आईच्या माहेरचे असावे, कारण आईच्या माहेरी नातवंडांना जरा जास्तच लाड होतात, लेकीच्या मुलांचे. असा बरेच जणांचा अनुभव असेल कारण दुधावरच्या सायीसारखे या नातवंडांचे खूपच लाड होत असतात.

तर आजोळ म्हणजे काय तर मायेचा पाझर असलेले, हक्काचे लाकडाचे, मस्ती करण्याचे घर. तिथे सारी चंगळच चंगळ. आजी आजोबांना आपल्या पहिल्या वहिल्या नातवंडांचे अमाप कौतुक असते, अप्रूप असते. मग ते मुलाचे मूल असो किंवा मुलीचे मूल असो. मुलगा असो की, मुलगी असो. आणि त्यातल्या त्यात जर मोठ्या मुलाला पाहिला मुलगा असेल तर घराण्याचा वारस म्हणून, वंशाचा दिवा म्हणून त्याचे फारच लाड होतात. पण एकंदरीत नातवंडांचे लाड जरा जास्तच होतात.

आता माझे म्हणाल तर मी वडिलांची मोठी मुलगी, पहिली मुलगी, वडील सर्वात मोठा मुलगा म्हणजे मी घरातील पहिली नात. माझी आई नेहमी मला सांगायची तू झालीस तेव्हा घरात सर्वांना खूप आनंद झाला, पहिली बेटी,धनाची पेटी अशी पूर्वी म्हण होती. आईच्या

माहेरी मी झाले तेथेही सर्वांना माझे खूप कौतुक होते. मी झाल्यापासून माझे नेहमी दोन्हीकडे लाड होत असत. असे आई म्हणायची, मी नाही हं! तर काय सांगत होते की, माझे खूप थाटामाटात सगळे बालपणीचे सोपस्कार झाले. आईची आई तर खूपच प्रेमळ आणि हौशी होती, आईचे माहेरचे कुटुंब ही मोठे होते.

जर कुणी माझा मामाच्या गावाला जाऊ या हा लेख वाचला असेल तर आमचे भरपूर लाड, आणि गमती जमती आपल्याला वाचायला मिळाल्या असतील. दीड वर्षापूर्वीचा तो लेख. असो.

तर आईच्या माहेरी खूप थाटामाटात, आणि आजी खूप हौशी असल्यामुळे, मेहनती असल्याने आणि सुगरण असल्याने आईला कुठे ठेवू नि कुठे नको असे तिला व्हायचे. तिने खूप सागुती ने आईचे, आणि माझे लाड केले, बाळंतपणात लागणारी, औषधे, काढे, खाणेपिणे अगदी ती फार हौसेने करायची, तसेच आजी चांगली कलाकार होती ती सुंदर नक्षीदार कपडे शिवाय ती, वेगवेगळ्या डिझाइनची उबदार दुपटी, गोधड्या ही तिने शिवल्या होत्या, आमच्या आईच्या घरात त्या कित्येक वर्षे वापरल्या गेल्या, कित्ती बाळांनी आम्ही सख्ख्या चुलत, आते भावंड्रानी त्या दुपट्यांची मायेची उब घेतली. आजीचे सगळे सद्गुण आमच्या आईत होते, कुटुंब मोठे, चुलत कुटुंब ही तेथेच असल्याने मामा, मावश्यांचा तोटा नव्हता, मी आई पेक्षा इतरांकडे असायची. नंतर आई सासरी आली.

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

इथेसुद्धा मी खूपच लाडकी झाले, आई म्हणायची तू खूप सुंदर होती, सगळे जण खूप लाड करायचे, आत्या, काका, आजी, आजोबा मी सर्वांच्या गळ्यातला ताईत होते. घरात खूप वर्षांनी लहान मूल आले होते. त्यामुळे आजूबाजूच्या आओळखीच्या बायका पण येत असत, मला खाऊ, खेळणी देत असत, आजूबाजूला ही सगळ्यांची लाडकी होते. आणि अजूनही आहे.

तर आजोळ हे खरंच खूप जवळचे, मायेचे ठिकाण असते. माझी आत्या तर प्रत्येक ठिकाणी मला घेऊन जायची, माझ्या तिन्ही आत्या खूप च लाड करायच्या. आई तर आमची साक्षात वात्सल्य मूर्ती.

आता माझे लहानपणी इतके लाड झाले की विचारात नका. आई मला नेहमीच सांगायची तुझे सर्वात जास्त लाड झाले. आजोबा शिक्षक होते त्यांनी लाड करता करता आम्हा सर्व भावंडांना त्यावेळी आम्ही चार भावंडे, आणि चुलत, आते भावंडे ही सुटीत यायची. खेळ, अभ्यास, परवा, शुभंकरोति असे सारे शिकविले. आजी सुद्धा छान गोष्टी सांगायची, पुराणातल्या कथा, महाभारत, रामायण वगैरे तील गोष्टी, आम्ही तल्लीन होऊन ऐकायचे, जात्यावरच्या ओव्या, मंगळागौरीच्या खेळ अशा अनेक संस्कारित गोष्टी त्या काळात शिकल्या गेल्या. घरकामात मदत करण्याची सवयही कधी लागली कळलेच नाही. मोबाईल, टीव्ही, रेडिओ ही नव्हते नंतर आले सारे. पण त्यावेळी देवळात जाणे, तेथील सणावारां प्रमाणे होणारे सर्व धार्मिक, गणेशोत्सव, दिवाळी वगैरे कौटुंबिक कार्यक्रम पहात, मदत करीत आम्ही मोठे झालो.

(क्रमशः)

जात्यावरच्या ओव्या.....

झाड आंब्याच झाड
नेल्या तोडून डहाळ्या
लगीनघाई गावात
तोरण वाड्याला सगळ्या ||५२०||

झाड आंब्याच झाड
तोडते हिरवे पान
सणावाराला शोभते
घरादाराला तोरण || ५२१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनाचे श्लोक – एक सार्वकालिक मनोपनिषद

ज्योतिर्मय साहित्य

मना सज्जना भक्तीपंथेची जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।
जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्वभावे करावे ।२।

अर्थ :

हे सज्जन मना, तू भक्तीमार्गानेच वाटचाल कर. त्या मार्गावर चालल्यास तुला निश्चयाने परमेश्वराची प्राप्ती होईल. समाजासाठी घातक ठरणाऱ्या गोष्टींचा त्याग कर आणि समाजहिताची, कल्याणकारी कर्मे पूर्ण भावाने आचर.

या श्लोकात समर्थ रामदासांनी मनाला ''सज्जन'' असे संबोधले आहे, हे अत्यंत अर्थपूर्ण आहे. एखाद्याला सज्जन म्हटले, की त्याच्याकडून सज्जनासारखेच वर्तन अपेक्षित धरले जाते. कदाचित म्हणूनच समर्थांनी मनाला सज्जन म्हटले असावेमनावर विश्वास ठेवत, पण त्याचबरोबर त्याला जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

मन स्वभावत: चंचल आहे. त्याच्या असंख्य वाटा आहेत. परंतु त्या सर्व वाटांमधून अंतिमतः हितकारक ठरणारी वाट म्हणजे भक्तीमार्गहे समर्थ येथे ठामपणे सांगतात.

ईश्वरप्राप्तीसाठी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तीमार्ग असे तीन मार्ग सांगितले जातात. त्यापैकी सर्वसामान्य माणसाला सहज आचरता येणारा, जीवनाशी सलग राहणारा आणि व्यवहारात उतरवता येणारा मार्ग म्हणजे भक्तीमार्ग. म्हणूनच सर्व संतांनी एकमुखाने भक्तीमार्गाचे महत्त्व प्रतिपादित केले आहे. समर्थही येथे तेच सांगतातभक्तीमार्ग हा सरळ, सोपा आणि थेट ईश्वराकडे नेणारा आहे.

खरं तर जीव हे परमेश्वराचेच स्वरूप आहे; पण अज्ञानामुळे तो त्या परमेश्वरापासून दूर गेलेला असतो. जेव्हा जीव भक्तीमार्गावर चालू लागतो, तेव्हा ईश्वर त्याच्यासमोर उभा राहतोईश्वर सन्मुख होतो. आणि एकदा का ईश्वर सन्मुख झाला, की त्याच्या चरणांपर्यंतची वाटचाल आपोआप सुरू होते. म्हणूनच समर्थ येथे ''भक्तीपंथ'' हा शब्द वापरतात. हा केवळ विचारांचा नव्हे, तर प्रत्यक्ष चालण्याचाआचरणाचामार्ग आहे.

या श्लोकातील तिसरी आणि चौथी ओळ विशेष अर्थपूर्ण आहे

''जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्वभावे करावे''

येथे 'जनी' म्हणजे केवळ सामान्य लोक असा अर्थ अभिप्रेत नाही. जनी म्हणजे समाजातील सज्जन, विचारवंत, ऋषितुल्य व्यक्तीज्यांच्या विवेकावर आणि आचरणावर समाज उभा राहतो. अशा सज्जनांना जी गोष्ट निंद्य वाटते, ती आपण टाळावी; आणि जी गोष्ट त्यांना वंद्य, म्हणजेच आदरणीय वाटते, ती पूर्ण भावाने आचरावीहा या ओळींचा गाभा आहे. **(क्रमशः)**





श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

भगवंताच्या प्राप्तीसाठीच जन्माला आला आहे

ज्योतिर्मय साहित्य

भगवंत एकच ओळखतो : जो त्याची भक्ती करतो, तो त्याला आवडतो. तिथे जातीचे, वर्णाचे बंधन नाही. आपण भाग्यवान कुणाला म्हणतो ? ज्याच्याजवळ पैसा अधिक असतो त्याला; पण तो काही खरा भाग्यवान नव्हे. ज्याला भगवंत भेटला तो खरा भाग्यवान. भगवंत आपल्याला भेटणे हे प्रत्येकाने जीवनातले मुख्य कार्य समजावे. पैसा भगवंताच्या आड येत नसतो; आपला अहंकार, मीपणा, हाच मुख्यत: भगवंताच्या आड येतो. ' मी सेवा करतो ' असे जो म्हणतो त्याची खरी सेवाच होत नाही. कर्ते पणा आपल्याकडे घेतो तोपर्यंत सेवा नाही घडली. भगवंताची आठवण ठेवून जे जे कर्म आपण करतो ते ते पुण्यकर्म होते. भगवंत माझ्याजवळच आहे अशी श्रद्धा ठेवून वागा. श्रद्धेने जो करील त्याला फळ येईल खास. पण म्हणून श्रद्धेवांचून केलेले भजनपूजन वाया जाते असे नाही समजू. भगवंताची भक्ती उत्पन्न व्हावी म्हणूनच भजनपूजन करावे, मनाचे रंजन म्हणून करू नये. सत्कर्म करणारे पुष्कळ असतात, पण पुष्कळ वेळा त्यात स्वार्थबुद्धी असते. फळाची आशा न ठेवता सत्कर्म करणे हीच खरी भक्ती.

सर्वांभूती भगवद्भाव ठेवावा हेच परमार्थाचे खरे सार आहे. माझ्यामध्ये भगवंत आहे हे मी ओळखले म्हणजे इतरांच्या ठिकाणी त्याला पाहता येईल. ' मी कोण ' हे न ओळखल्यामुळेच आपले सर्व चुकते आहे. माझ्यात भगवंत आहे हे दोन प्रकारे पाहता येते. सर्व चेतना त्याच्याकडून मिळते हे एक. दुसरे म्हणजे, ' देह ठेवला ' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ठेवणारा कोणी दुसरा असला पाहिजे; म्हणजे देह हा ' मी ' नव्हे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती यांचा साक्षी कुणीतरी आहे हे खास. ' मी कोण ' हे जाणायला साक्षीरूपाने वागावे. सर्व जगाला मी माझे म्हणतो, पण जो खरा माझा त्याला तसे म्हणत नाही. भगवंत माझ्यात आहे ही जाणीव उत्पन्न करून घ्यावी. अनुमानाने आणि अनुभवाने पाहिले तर भगवंत माझ्यात आहे हे खात्रीने पटेल. वर्षाचा आनंद पाडव्यापासून, आयुष्याचा आनंद वाढदिवसापासून, आणि दिवसाचा आनंद सकाळपासून सुरू होतो, म्हणून भगवंताच्या भक्तीला आपण त्याच्या नामाने सुरुवात करावी; म्हणजे त्यामुळे होणारा आनंद लगेच आपल्याला मिळेल; सुरुवात गोड आणि शेवटही गोडच होईल. आकाश हे जसे सर्वांना सारखे आहे, त्याचप्रमाणे मानवजन्माचे ध्येय हे सर्वांना सारखेच आणि एकच आहे. कोणत्याही जातीतला, धर्मातला किंवा देशातला मनुष्य असो, तो भगवंताच्या प्राप्तीसाठी म्हणजे परमार्थासाठीच जन्माला आला आहे.

आपण भगवंताला शरण गेलो, तर तो आपल्याला हातचा कधी सोडणार नाही.

***

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस दुसरा

पुढे.....

माणसांनी काळाचा विचार करावा.तुकोबा म्हणतात, जेव्हढा काळ कथा कीर्तनात जातो तो काळ यम मोजत नाही.

आपले अध्यात्म प्रपंचाला विरोध करीत नाही. ल्यावें खावे... एवढंच पुरता संसाराचा विचार करावा. आपण स्वच्छ नेटके रहावे.फाटके कपडे घालणे हे वैराग्याचे लक्षण नाही.

आपल्या संसाराची सुरुवात कुठून होते. आत्मा अंत:करणात छिन्न झाला की संसार सुरू झाला. ल्यावें खावे यात संसार नाही. पण द्यावे खावे ते ते, बरे, सदैव छानच असावे, असे केले की तो संसार आहे. आम्ही संसारात असे चिकटले आहोत की, ओले नारळ कवटीला कसे चिकटलेले असते तसे. भागवतांच्या आकृतीबंध मी आपणास मी सांगत आहे.भागवतांच्या हा तांत्रिक भाग आहे ऐका... आपण संसारात आहोत की परमार्थात आहोत ज्या. सीमारेषेवर आपण आहोत.

रात्रंदीन आम्हा युद्धाचा प्रसंग.. संसार व परमार्थाचे युद्ध.. संसार की परमार्थ यातील द्वंद माणसाचे मनात कायम चालू असते. आपल्याला दोन्ही थोडे थोडे करायचे आहे. दोन्ही एकाच वेळी साधेल का? एकही आपल्या पदरात पडत नाही.

या दोन्हीतील सीमारेषा आम्हाला भागवत सांगते. गजेंद्र मोक्ष कथा का आली?

गजेंद्रानी त्याचे नातेवाईक मदतीसाठी बोलाविले. त्यांनी मदत केली, पण त्यांनी असे पाहिले की, आपण अपुरे पडतो आहोत. मगरी पासून आपण गजेंद्रास वाचवू शकत नाहीत. नातेवाईक बाजूस सरले.आपलेही असेच आहे. नातेवाईक बरोबर येत नाही.मग देवाचा धावा गजेंद्राने केला.

ज्याला आपण माझे माझे म्हणत आलो, तो एक मर्यादेच्या पुढे सोबत येत नाही. जो नेहमी सोबत देतो त्याला आपण आठवत नाहीत. क्रमश :.....

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

तुम्ही महागडे तिकिट काढून सिनेमागृहात जाता. तिथले वातावरण निर्माण करण्याची कला निर्माता, दिग्दर्शकाला आलेली असते. पण गुंडगिरी, मारामारी, असे वाईट प्रसंग पाहिले तर आपण पैसे मोजून आपला अमूल्य वेळ खर्च करून हे वाईट कृत्य बघण्याची गरज काय आहे असे मला वाटते. त्यापेक्षा भगवंताचे नामस्मरण, निरूपण कथा ऐकल्या तर आनंद मिळतो.

मित्रांनो बघा तुम्हाला नक्की श्रवणभक्तिचा पर्याय आवडेल हो ना!!! आपण जे श्रवण करतो त्याच्या अर्थाकडे लक्ष देणे याला मनन म्हणतात. त्या अर्जावर न किंवा लक्ष एकाग्र झाले की त्याला निदिध्यासन म्हणतात. निदिध्यासनाने आत्मसाक्षात्कार होतो. जीवनभर समाधानी रहाण्याची वृत्ती वाढीस लागते. आपण संसारी माणसं आहोत. त्यामुळे संसाराच्या रहाटगाडग्यात कितीही फिरलो तरी समाधान होत नाही. मन खूप चंचल असते. ते सतत संशयाच्या फेऱ्यात अडकलेले असते. ही संशयाची बाधा कमी करण्यासाठी पून्हा पून्हा संतवाक्याचा आधार घ्यावा.संताच्या श्रवणातून आपल्यात आरपार बदल होतो. यासाठी महान व्यक्तींच्या संपर्कात आल्याने आपल्याला काही तरी स्पंदन त्यांच्यातील मिळतील हा लोभ जरूर ठेवावं. सोने नाणे, घरदार, वेगवेगळ्या प्रकारची संपत्ती गोळा करत बसण्यापेक्षा ही संत सहवासाची श्रवणभक्ति केव्हाही आपल्याला सन्मानाने जगण्याचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी प्रेरित करेल. यावर विश्वास ठेवणे. संत जे बोलतात ते एकून त्याचा अर्थ बरोबर लक्षात आला तर मन समाधानी रहाते. मनातील मळभ दूर होते. मनाच्या चंचलपणाला आवर बसतो. चांगले काय? वाईट काय? याचा ताळमेळ मनाला समजतो.

जेवणानंतर फेरफटका मारणं मधुमेहींसाठी उपयोगी

ज्योतिर्मय साहित्य

जेवल्यानंतर थोडा वेळ फिरणे किंवा चालणे ही बहुतांश भारतीयांच्या सवयींपैकी एक आहे. त्यामुळे पचन क्रिया सुधारते असा अनेकांचा विश्वास आहे.

पण जेवल्यानंतर फेरफटका मारल्याने पचनक्रिया खरच चांगली राहते का? नुकत्याच झालेल्या एका संशोधनात यावर विशेष अभ्यास करण्यात आला आहे. च्या बातमीनुसार, जेव्हा तुम्ही जेवता तेव्हा पोटात गेल्यावर अन्नाचे तुकडे होतात. यानंतर शरीर या अन्नातून आवश्यक पोषक द्रव्ये शोषून घेते.

अन्नाच्या महत्त्वाच्या भागाचे पचन लहान आतड्यात होते. संशोधनात असे म्हटले आहे की, जेवणानंतर फेरफटका मारल्याने अन्न पोटात गेल्यावर खूप लवकर आतड्यात पोहोचते, त्यामुळे पचन व्यवस्थित होते. याशिवाय चालण्याचे इतरही अनेक फायदे आहेत. चालणे हे कार्डिओ व्यायामासारखेच आहे.

यामुळे संपूर्ण शरीरात हालचाल होते जी आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. चालल्याने पचनक्रिया गतिमान होते जेवणानंतर चालण्याने पचनक्रिया गतिमान होते, अन्न जितक्या वेगाने पोटातून लहान आतड्यात जाते, तितक्या लवकर तुम्हाला ब्लोटिंग, गॅस आणि ॲसिड रिफ्लक्स सारख्या सामान्य समस्यांपासून आराम मिळेल. अनेक संशोधनातून हे समोर आले आहे की, जेवणानंतर नियमित ३० मिनिटे चालण्याने आतड्यांचे कार्य सुधारते, तसेच बद्धकोष्ठतेची समस्या कमी होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर : संशोधनात असे म्हटले आहे की, जेवणानंतर चालणे केवळ पचन सुधारत नाही तर टाइप–२ मधुमेहाच्या रुग्णांना देखील फायदा होतो. न्यूझीलंडच्या ओटागो विद्यापीठातील संशोधकांच्या मते, जेवणानंतर ग्लुकोजची पातळी वाढते. या ग्लुकोजच्या वाढलेल्या पातळीला नियंत्रित करण्यासाठी इन्सुलिन स्रावित केले जाते. परंतु, टाइप–२ शुगर असलेल्या रुग्णांमध्ये इन्सुलिन योग्य प्रकारे काम करत नाही. म्हणून, जेव्हा तो अन्न खाल्ल्यानंतर चालतो तेव्हा बहुतेक ग्लुकोज शरीरात उर्जेच्या स्वरूपात खर्च होते. त्यामुळे मधुमेही रुग्णांच्या रक्तातील साखरेची पातळी वाढत नाही. संशोधनात असेही म्हटले आहे की, जे लोक जास्त कार्बो हायड्रेटयुक्त अन्न खातात त्यांनी जेवल्यानंतर नक्कीच चालावे, खाल्ल्यानंतर चालण्याने शरीरातील क्रियाकलापांसाठी ऊर्जा निर्माण करण्यासाठी ग्लुकोजचा वापर केला जातो. रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करण्यास त्यामुळं मदत होते.

वृक्षसेवेतून समृद्धी

एका गावात एक विधवा महिला आणि तिचा जगत नावाचा मुलगा राहत होते. त्यांच्या घराजवळ एक पिंपळाचे झाड होते. जगत आईच्या सांगण्यावरून त्या झाडाला रोज पाणी देत असे. त्याच्याजवळचा परिसर स्वच्छ ठेवत असे. एकदा जगत आजारी पडला तरी त्याने झाडाला पाणी देण्याचे व स्वच्छतेचे काम चालूच ठेवले. आजारपणातही हा मुलगा आपली सेवा करत आहे हे पाहून पिंपळवृक्षात निवास करणा-या एका देवतेला खूप समाधान वाटले. जगत जवळ येताच देवता त्याच्याशी बोलू लागली," हे मुला मी तुझ्या या सेवेवर प्रसन्न झालो आहे. तुला जो काही वर पाहिजे आहे तो मागून घे." जगत म्हणाला," हे वृक्षदेवते, मी तुमची सेवा काही मिळवायची अपेक्षा ठेवून करत नाही. तुमच्यामुळे आम्हाला स्वच्छ हवा, सावली आणि लाकूड मिळते. आमच्या जीवनाचा तूच एकमेव आधार आहेस. मला काहीही नको." यावर वृक्षदेवतेने त्याला काहीतरी मागण्याचा हट्टच धरला. तेव्हा जगतने झाडाखाली पडलेली पाने नेण्याची इच्छा व्यक्त केली. पिंपळदेवतेने त्याला अनुमती दिली. जगतने पाने गोळा केली व घरी आणून एका कोप-यात ठेवली. दुस-या दिवशी सकाळी जेव्हा तो व त्याची आई उठून पाहतात तर काय पिंपळाची सगळी पाने सोन्याच्या पानात बदलली होती. जगतने वृक्षदेवतेचे आभार मानले. तात्पर्य – निरपेक्षबुद्धीने सेवा केल्यास आपल्याला फळ निश्चितच मिळते.

प्रतिभा संपन्न आणि सामाजिक कामाची आवड जपणाऱ्या मृणालताई जैन

ज्योतिर्मय साहित्य

काही व्यक्ती वरून कितीही शांत दिसत असल्या तरी त्यांची वैचारिक क्षमता काही वेगळीच असते.अतिशय सुंदर मनाच्या, शांत, संयमी, आपल्या चांगल्या कामात सतत मग्न असणाऱ्या, आणि ते काम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नेहमीच धडपड करणाऱ्या,व्यक्ती मला विशेष भावतात.

अश्या व्यक्ती विचार, चिंतन, मनन करणाऱ्या विचारसरणीच्या असतात.

काहीच महिन्यांपूर्वी एका साहित्यिक कार्यक्रमात सौ. मृणालताई हेमंत जैन यांची आणि माझी ओळख झाली, आणि बघता बघता आमची मैत्री वाढत गेली. म्हणतात ना मैत्रीत वयाचे संबंध येत नाही. अगदी तसेच झाले आणि मला वयाने बरीच लहान बहिण भेटली. शांत, निरामय भाव असा त्यांचा स्वभाव आहे. त्यांची समाजाभिमुख कार्यासाठीची अगम्य इच्छा शक्ती, तळमळ मला हळू हळू समजत गेली. आणि मला त्यांचा सार्थ अभिमान वाटला.

मृणाल ताई या वाणिज्य शाखेतील एम कॉम.. फायनान्स असून इंटिरियर डिझाईनर सुद्धा आहेत. ग्रेस आणि इंटिरियर या संस्थेच्या संचालिका म्हणून मागील १२ वर्षापासून त्या कार्यरत आहेत.

समाजसेवा हा मृणाल ताईंचा आवडीचा विषय आहे.समाजाकडे सृजनशीलतेने बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन आहे. अर्थात सृजनशीलता म्हणजे कोमलता, नाजुकता. त्या अतिशय हळुवारपणे समाजातील अनेक स्तरातील समस्यांचा अगदी प्रगल्भ पणे विचार करतात... हो... कारण त्यांची स्वतःची मुलगी असून देखील, वयाने मोठी मुले समाजसेवेच्या प्रेरणेतून दत्तक घेऊन त्यांची पूर्णपणे काळजी घेत असतात. त्यांच्या प्रत्येक बारीक सारीक गोष्टीत जातीने लक्ष घालून त्या सुविधा सर्व दत्तक मुलांना पुरवितात.तसेच पुण्यातील अनेक अनाथालयात स्वयंसेवक म्हणून काम पाहतात.

त्यांनी वुई विल फाउंडेशन संस्थेच्या

कार्यकारिणीत काम केले आहे. अजून एक मृणालताईंचे वाखाणण्या जोगे काम म्हणजे प्रतिपालकत्व या उदात्त हेतूने काम करणाऱ्या स्वनाथ फाउंडेशन या संस्थेत कमिटी मेंबर असून त्या स्वतः त्यासाठी सर्व प्रकारचे कामे करत असतात.

मृणाल ताई अनेक संस्थांशी निगडित आहेत. त्यांना समाजसेवेसाठीचा काव्य मित्र संस्थेचा २०२३ चा राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार मिळाला आहे. तसेच समाज सेवेसाठीचा रोटरी क्लबचा नवदुर्गा २०२४ चा ही पुरस्कार मिळाला आहे. मृणाल ताईंचे काम फार मोठ्या प्रमाणात आहे.. थांबा हं!!! अजून आहेत हो... कार्य ही आणि पुरस्कार ही...

त्यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये आदिश जैन फाऊंडेशनची स्थापन केली. आणि त्याचे काम जोमाने सुरू झाले आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून तब्बल ९ वेळा त्या विविध ठिकाणी उपस्थित होत्या.

संगीतकार सलील कुलकर्णी,शिक्षण तज्ञ डॉ. न. म.जोशी, ८९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, स्नेहालय संस्थेच्या समाजसेविका शुभांगी कोपरकर, प्रसिद्ध समाज सेवक पुष्कर अबनावे या दिग्गज मान्यवरांनी त्यांच्या संस्थेच्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

समाज सेवा या बरोबरच काव्य लेखन हा देखील मृणाल ताईंचा बालपणीपासूनचा छंद आहे. अगदी लहान वयात त्यांना लिखाणाची साहित्याची आवड असल्याने त्यांना अनेक काव्य स्पर्धेत त्यांना बक्षीस प्राप्त झाले आहे. नियतकालिका,दिवाळी अंक यात सुद्धा लेख, कविता, ललित वेळोवेळी प्रसिद्ध होत असतात.त्या पुणे साहित्य परिषदेच्या आजीवन सदस्य आहेत. या शिवाय युट्यूब वर साहित्य रुची या चॅनलवर त्यांचे व्हिडिओ बघायला मिळतात. ५०० पेक्षा जास्त कवितांचे लेखन करून त्यांनी वाचन केले आहे.निहार प्रकाशनाच्या कथापूर्ति स्पर्धेत ७५ पेक्षा अधिक स्पर्धांकातून पहिला क्रमांक त्यांना प्राप्त झाला होता. त्यांचा काव्य संग्रह लवकरच प्रकाशित होणार आहे.

तसेच बालसाहित्य व मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या अमरेंद्र भास्कर बालकुमार संस्थेच्या कार्यकारिणीवर त्या कार्यरत आहेत. ज्या अंतर्गत बाल कुमारांसाठी पाचव्या अखिल भारतीय संमेलन आयोजित करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.ते घडवून आणताना अनेक आघाड्यांवर त्याने सक्रिय सहभाग नोंदवला. कमी वयात जास्तीत जास्त काम मृणाल ताईंनी केल्याचे दिसून येते आहे. जिल्हा परिषद पुणे, बालकुमार साहित्य संमेलन २०२५ च्या नियोजनात समन्वयक म्हणून काम पाहिले.त्या अंतर्गत विविध तालुक्यांमध्ये काव्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले...

तसेच संस्थेसाठी बालसाहित्याच्या पुस्तकांचे परीक्षक म्हणून काम पाहिले. सध्या पुरस्कार समिती प्रमुख, बाल काव्य स्पर्धेचे तालुकास्तरीय स्पर्धेचे परीक्षक म्हणून जिल्हा परिषद पुणे कडून नियुक्ती झाली आहे.आयुष्याचे प्रतिबिंब या काव्य पत्रिकेच्या उपसंपादक म्हणून त्या काम पाहतात.

९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांच्या कवितेची निवड झाली आणि तिथे सादरीकरण ही केले. मावळ विचारमंच येथे हजार प्रेक्षकांसमोर प्रसिद्ध कवी प्रशांत मोरे यांच्या सवेत कवितांचा कार्यक्रम केला. आणि बालगंधर्व रंगमंदिर येथे कविता सादर केली व सूत्र संचालन ही केले..

मृणाल ताईंना तितिक्षा संस्थेचे काव्य रत्न पुरस्कार २०२५ प्राप्त झाला आहे. प्रसिद्ध गझलकार म. भा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काव्य क्षेत्रातील वाटचाल सुरु आहे. कवी तसेच सूत्रसंचालक म्हणून त्यांचे रेडिओवर त्यांचे अनेक कार्यक्रम झालेले आहेत, होत आहेत.

खरेच मृणाल ताई एकच वेळी अनेक कामे अगदी लिलया पार पाडत आहेत. मृणाल म्हणजे कमळाचे देठ. कमळाचे देठ हे नाजूक कोमल, सौंदर्याचे प्रतीक तर असतेच त्या बरोबर पवित्रतेचे सुद्धा प्रतीक आहे. मृणाल ताई या त्यांच्या मृदु कोमल स्वभावा बरोबर एक फार मोठे पवित्र काम करत आहेत. आणि ते म्हणजे समाज सेवेचे. ते ही अगदी तन, मन, धन लावून,अगदी मृणाल या नावाला साजेसे.....पवित्र.

शिप्र मंडळी, पुणेच्या संचालकपदी प्रा.सुरेश मंकणी यांची निवड

जैन कासार प्रतिष्ठानतर्फे हृद्य सत्कार

ज्योतिर्मय साहित्य

सोलापूर : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे ३० या नामवंत शिक्षण संस्थेच्या संचालकपदी सोलापूर येथील प्रा.सुरेश मंकणी यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यानिमित्ताने जैन कासार प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा हृद्य सत्कार अध्यक्ष हुकूमचंद हेसे, पौरवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे, दि. जैन कासार समाज संस्थेचे कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर यांच्या हस्ते सत्कार आला. यावेळी राजेश मोहोळकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या सिनेट सदस्या एडव्होकेट सौ. नीता मंकणी उपस्थित होत्या.

जमखंडी येथे शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळेतच शिक्षण घेतलेल्या सुरेशबाबू मंकणी यांची त्याच संस्थेच्या संचालकपदी व सोलापूर विभागाच्या प्रमुखपदी निवड होणे गौरवास्पद आहे. तसेच जैन कासार समाजासाठी अभिमानास्पद आहे.

मंकणी यांनी लातूर तसेच सोलापूरच्या नामांकित वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केलेले आहे. अ. भा. विद्यार्थी परिषदेचे ते सक्रिय कार्यकर्ते राहिले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल दि. जैन कासार संस्थेचे अध्यक्ष विजय अण्णा कासार, संस्थापक पोपटलाल डोर्ले, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, चेंबर ऑफ कॉमर्सचे संजय कंदले, जैन कासार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, उपाध्यक्ष सौ. माणिकताई व्यवहारे, शेठ गोविंद रावजी आयुर्वेदिक महाविद्यालयाचे ग्रंथपाल महावीर लाळे आदींनी अभिनंदन करून त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विशेष उपक्रम

पिंपळे सौदागर येथील पुस्तक प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – वाचनसंस्कृतीचा प्रसार, प्रचार आणि संवर्धन होण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनास पहिल्याच दिवशी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशन आणि पिंपरी चिंचवड भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठच्यावतीने पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन सोसायटीच्या आवारात तीन दिवसीय पुस्तक प्रदर्शनास शुक्रवारी प्रारंभ करण्यात आला. पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे यांच्या पुढाकाराने आणि सुनिधी पब्लिशर्सच्या सहयोगाने आयोजित या पुस्तक प्रदर्शनाचे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, अनिता काटे, ना. सी. फडके यांच्या कन्या गीतांजली जोशी, सुप्रसिद्ध लेखिका अनिता भिसे, विद्या बेल्लारे, उद्योजक धनंजय भिसे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. राजा काळे, सेंन्सार बोर्डाच्या सदस्या स्मिता बारवकर तसेच संदिप काटे, सुमित सिंह, डॉ. सुभाषचंद्र पवार, सखाराम ढाकणे, अनिलकुमार शाह, विलास जोशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी पुस्तक प्रदर्शनाच्या या उपक्रमाचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या तसेच पुस्तके विकत घेऊन वाचण्याचे आवाहन केले. पिंपरी चिंचवड भाजपाचे जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या उपक्रमाभ शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय भिसे यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी सुप्रसिद्ध गझल लेखक संतोष घुले यांनी सांभाळली तर सुमीत सिंह यांनी आभार मानले.



शुभं करोती म्हणा. लक्ष्मीला बोलवा

ज्योतिर्मय साहित्य

शुभं करोती म्हणा मुलांनो हे गाण बहुधा सर्वांना माहीत आहे हो ना?

मी आस्तिक आहे. त्यामुळे ज्यांची श्रद्धा आहे त्यांनीच वाचा.

आज पैसा लागतोच. पैशाच सोंग आणता येत नाही. गरीबी हा अभिशाप असतो. प्रत्येकजण धावतोय पैशासाठी. मेडीकल, शिक्षण, कुठे कुठे पाण्यासारखा लागतो. कोरोनामुळे लोकांचे व्यवसाय ठप्प झाले.

मी एक लेख लिहलेला होता. अर्थात संकलीत माहिती वरुन. त्यात सोपे उपाय दिले होते. जे जमण्यासारख होत ते मला आवडलं.

करुन बघायला काय हरकत आहे?

लक्ष्मी चंचल असते. आणि जेथे सतत भांडणे, क्लेश असतात. तिथे ती रहात नाही. अहो आपणसुध्दा राहू शकतो का?

साधा विचार म्हणून संध्याकाळी ७ च्या वेळेस तासभर घर आंनदी ठेवणे.

शुभं करोती कितीही मुले मोठी झाली तरी सवय करावी. प्रथम टाळाटाळ पण नंतर तेच त्या वेळेत घरी आपसूक येतात. माझा अनुभव.

नंदादीप तेवत ठेवणे.

पैसे येताच थोडे देवघरात ठेवून देवीचे आभार मानणे.

झाडू न दिसेल असा ठेवणे. पाय लावू नये कारण त्याचा अपमान लक्ष्मीचा अपमान. घरच्या स्त्री चे अपमान जेवढे जास्त तेवढे लक्ष्मी येण्याची शक्यता कमी. घरची लक्ष्मीस संतुष्ट ठेवल्यास पैसे येतातच.

श्री सुक्त एक वेळ रोज वाचणे, शुक्रवारी देवीस खिरीचा नेवैद्य दाखवणे, लाल फूल लाल रंग देवीस अत्यंत प्रिय म्हणून ती वाहणे.

श्री महालक्ष्म्यै नम: श्री विष्णवे नम:

कारण जेथे विष्णूचा वास तेथेच लक्ष्मीचा वास.

कमावलेल्या थोड्या भागातून अन्नदान करावे.

स्वस्तिक अत्यंत शुभ जरुर असावे.

संध्याकाळी उदबत्ती किंवा घरात सुगंध असावा.

कोणी सवाष्ण शुक्रवारी आल्यास दूध आणि हळद कुंकू जरुर द्यावे.

कधीही पैशाचा माज करुन नोकरांचा अपमान करु नका. लक्ष्मी टिकणार नाही.

व्यवसायात नवनवीन कल्पनांचा समावेश करा. लोकांना त्यांचे फायदे कसे होतील? हे पटवा. पैसा वाचवण

हे पैसा कमवण्यासारख़च आहे. बढाया मारण्यासाठी पैसा उडवू नका. उदा दारु, जुगार किंवा वायफळ खर्च.

कुमारिका पूजन नवरात्रीत करावेच. त्यांचे पाय धुवून त्यांस भेटवस्तू देऊन फळे तरी नक्की द्यावीत.

माझ्या प्ले स्कूल मधेच माझे कुमारिका पूजन छान होते.

कोणाचीच उधारी थोपवून त्यास त्रास देऊ नये.

श्रीफळ पूजन करावे. मार्गशीर्ष गुरुवार व्रत जमल्यास करावे.

उपवास करुनच देवी प्रसन्न होते हा गैरसमज सोडावा. मानसपूजा ही करता येते.

किती सुंदर देवीची देवळे असतात. त्यांचे दर्शन घेतले तरी पुरेसे असतात.

प्रयत्न न करता हाती आयते फळ येत नाही.

सदा माझी अडचण देवी दूर करणारच हा विश्वास असावा. वर्षातून एकदा सत्यनारायण पूजा घरात करावी. सप्तशतीतले कवच जरुर वाचावे.

सौ. माधुरी पळणिटकर,
सातारा. मो. 9921495533

कधिही मूठ आवळून ठेवली हातात काही येत नाही.

कंजूषपणा जितका जास्त तितकीच लक्ष्मी कमी येते.

नासाडी, अन्नाचा अपमान करु नये. दारासमोर रांगोळी, लक्ष्मीची पावले जरुर काढावीत.

पैसे खर्च झाले तरी पुन्हा मिळतील ही इच्छा तीव्र असावी.

आहे त्यात समाधानी रहा. दुप्पट मिळते कुणाची फसवणूक किंवा तिळतळाटाचा घास घेऊ नये. तो पचणार नाही.

निंदा जितकी जास्त तिथे लक्ष्मी येणार नाही.

आपल्या जिभेवर वाणी रुपाने सरस्वती विराजमान आहे. त्यामुळे जस बोलाल तसे परिणाम लक्ष्मी देते.

ताटावर बसल्यावर एक घास बाजूला ठेवावा.

कुत्र्यास, गोमाता यांना अन्न द्यावे. गायीस चारा जमल्यास द्यावा.

नवरात्रीत लक्ष्मी नऊ दिवस वास करते त्यामुळे ते नऊ दिवस जस जमेल देवीची सेवा करावी.

हिरवा, लाल रंग, गजरा देवीस अर्पण करावा. खूप खर्चीक होम केले तरच लक्ष्मी येते हा गैरसमज आहे.

खूप न पुर्ण होणारे नवस न बोलता भक्ती किती केली यापेक्षा ती किती आर्ततेने केली याला महत्व द्यावे.

कुठलेच काम करताना स्टेटस चा बडेजाव मारु नका. काम करताय हे महत्वाचे असते. बसून नवरा च्या कमाई वर शायनिंग न मारता.जी स्व कष्टाने १०० रुपये मिऴवते ती श्रेष्ठ ठरते

आता कोरोनामुळे ५० जण बोलावायचे लग्नाला तीच प्रथा कायम ठेवली तर किती लाख मुलींचे आई वडिलांचे वाचत आहेत.

अख्खा संसार का देयचा लग्नात? रुखवत म्हणून.आता बंद व्हावी ही पध्दत.

जितके आई वडील मुलगी ठरवतील तेच असावे. ती येयच्या आधी भांडी नसतात का घरात?

आणि शेवटी भाग्यात असेल तेवढे मिळते.

कुणाला नास्तिक असूनही मिळेल.

पण मी देवावर श्रद्धा ठेवते. म्हणून हे वाचण्यात आलेले सांगत आहेत.

आई अंबाबाई जे एका घासाला तरसत आहेत, ज्यांना अन्न, वस्त्र, निवारा नाही तिथेच तू पहिले जा कारण त्यांना तुझी जास्त गरज आहे.

माझ्या घरी तू निवास करच. पण आधी तू त्यांची दुःख दूर कर. जरुर करुन बघा. फरक पडेलच

फक्त शुंभ भवतू होण्याकरता शुभं करोती म्हणा. लक्ष्मीला बोलवा.

विद्यार्थ्यांना क्षमतेपेक्षा जास्त अभ्यासक्रम

ज्योतिर्मय साहित्य

आता शाळांमध्ये ही मुलांना भरपूर ॲक्टिव्हिटी दिल्या जातात, हे चांगलेच आहे, पण विद्यार्थ्यांच्या वयोमान आणि बुद्धी नुसार ते सर्व जमले पाहिजे. याचा कोणी विचारच करत नाही.

मी आता शाळेत जात नाही, पण माझी नात शाळेत जाते तिथे दर दोन चार दिवसांनी सांगितले जाते हे करुन आणा ते करुन आणा, तसेच सतत परीक्षा ही असतात, आणि त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त अभ्यासक्रम असतो, तसेच स्पेलिंग ही मोठमोठी असतात, एखादे स्पेलिंग चुकले तर लगेच मार्क कट होतात.

माझी नात स्वतःच अभ्यास करते, मुलगी घरीच तिचा अभ्यास घेते व परीक्षेच्या वेळी आईने विचारले पेपर कसा गेला तर सांगते रिझल्ट आल्यावर बघ. ती हुशार आणि एकपाठी असल्याने ९० टक्क्याच्या वर मार्क् असतात. पण मी ही तिला सांगितले आहे की, प्रत्येक वेळी पहिला नंबरच आला पाहिजे, किंवा खूप दबावाखाली तिचा अभ्यास घेऊ नको तिला नेहमी संस्कार, कला, बुद्धी यांचा सराव चालू ठेऊन तिची स्वतः ची क्षमता काय आहे ते पारखून तिच्याकडून अभ्यास करुन घे. सतत मुलांच्या मागे लागले तर मुलांना स्वतः चे अस्तित्व, बुद्धी मत्ता याची ओळख पटते नाही, आणि कधीही मुलांची दुसर्या मुलांबरोबर तुलना करु नये, तर त्यांच्या मूळच्या आत्मिक विकासाचा परामर्श घेऊन पालकांनी आपल्या मुलांचा विकास घडविणे आवश्यक आहे. खरं तर या विषयावर लिहायचे नव्हते, पण आताच तिचा फोन आला होता, आणि काहीतरी ॲक्टिव्हिटी, अभ्यासासाठी ती काही तरी मुलीला सांगत होती. सतत अभ्यासकांनी पण मुलांवर ताण पडत असतो. ज्यांचे पालक सुशिक्षित आणि कुटुंब वत्सल असतात ते नेहमी मुलांकडे लक्ष देऊन असतात. पण सर्व च शाळेत जाणाऱ्या मुलांचे पालक त्यांच्याकडे इतके लक्ष देऊ शकत नाहीत. आता तिच्या शाळेत पालक म्हणून ते नेहमी हजर असतात, पण पालक सभेत एक दोन पालकांशिवाय समर्पक मुद्दे मांडू शकत नाहीत, काही पालक ट्युशन लावून मुलांची प्रगती शिक्षकांवर सोडून देतात सर्वच पालक सुशिक्षित असतात असे नाही, ती फक्त मुलांना शाळेत पाठवतात बाकी शाळेत त्यांची प्रगती कशी चालली आहे तिकडे त्यांचे लक्ष नसते. तर काही पालक अतिचौकस असतात. पण सारासार विचार केला तर पालकांनी अधून मधून शाळेत जाऊन आपल्या मुलाची प्रगती कशी चालली आहे इथे लक्ष द्यायलाच हवे. प्रत्येक मूल फक्त अभ्यासात हुशार असेल असे नाही, पालकांना हे माहीत असायला हवे की आपल्या मुलाकडे, अभ्यासा व्यतिरिक्त आणखी काही कौशल्ये आहेत कां? आणि त्यानुसार त्या

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

मुलांकडे तसे लक्ष देऊन त्याही बाबतीत मुलांना सहकार्य करावे.

तसेच इंग्रजी माध्यम पुढील शिक्षण किंवा प्रवास, नोकरी, बाहेरच्या जगात वापरण्यासाठी अत्यंत गरजेचे असले तरी आपल्या मुलांना आपली मराठी भाषा शिकवायला हवी, सुसंस्कार शिकवायला हवेत.

नाईलाजाने काही इतर शाळेत पाठवायला लागले तरी घरी आपल्या धर्मांचे संस्कार, नियम, माहिती मुलांना पालकांनी शिकवायलाच हवी. त्यासाठी नोकरीचे निमित्त सांगून पळवाट काढू नये.

आईवडिलांनी कितीही पैसा कमावला तरी सुसंस्कार, सुसंगत, सद्वर्तनाचे धडे हे बाहेरच्या जगातून विकास घेऊ नये, तर या सर्व गोष्टी पालकांनी आपल्या मुलांना शिकवायलाच हव्यात. मुलांनी जर आईवडिलांचा आदर करावा असे वाटत असेल तर सुसंस्काराचे बाळकडू आपल्या घरातूनच मुलांना दिले पाहिजेत. आपली मराठी भाषा मुलांना शिकवली पाहिजे, आपल्या, चालीरिती, मोठ्यांशी, पाहुण्यांशी वागण्याची पद्धत, संस्कार हे सर्व जर घरातून मिळाले तर आपोआपच मुलांना सर्व काही चांगलेच मिळेल. हो, आणि खूप मोठी पदवी, खूप मोठी श्रीमंती म्हणजे जीवन नव्हे तर आपण ज्या मातीत जन्माला आलोत, ज्या घरात जन्माला आलोत त्याच्याशी सदैव कृतज्ञ रहायला हवे. ज्या परमेश्वराने आपल्याला मनुजन्मात जे काही कार्य करण्यास इथे पाठवले आहे, त्याचा नक्की च काहीतरी उद्देश आहे. हे आपण समजून घेतले तर आपल्यालाही नक्कीच स्वयंप्रेरणेने मिळेल.

जीवनाच्या या रंगमंचावर प्रत्येक वेगवेगळा कलाकार आहे. प्रत्येकाचा वेगवेगळा आविष्कार आहे. आणि आपण सर्वांनी मिळून त्याचा सुंदर प्रत्यय घ्यायचा आहे.

***

साहित्यक्षेत्रातही अमीट ठसा उमटवलेले डॉ. निशिकांत श्रोत्री

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर निवडक सात-आठ विद्यार्थ्यांना मराठे सरांनी रोज रात्री नऊ वाजता त्यांच्या सदाशिव पेठेतील नागनाथ पाराच्या जरासे पुढे असलेल्या वाड्यातील त्यांच्या सर्वात वरच्या मजल्यावरच्या बिऱ्हाडात अभ्यासासाठी बोलविले होते. दरवर्षी अकरावीच्या बॅचमधील निवडक विद्यार्थ्यांना ते बोलवून प्रामुख्याने दोन गोष्टीवर भर देत अभ्यास करून घेत. शास्त्रातील विधाने मुलांनी केवळ पाठ करता कामा नयेत तर, ती विधाने शास्त्रीय तर्कशुद्धतेच्या आधारावर त्यांना अंतर्बाह्य आकलन झाली पाहिजेत असा त्यांचा पहिला मुद्दा असे. आकलन झालेले ज्ञान विद्यार्थ्यांना अधिकाधिक गुण मिळवण्यासाठी परीक्षेत मुद्देसूद मांडता यावे हे दुसरे उद्दिष्ठ असे. त्यासाठी केवळ एका विद्यार्थ्यांसाठी एखाद्या मुद्यावर देखील कित्येक तास घालविण्यात मराठे सरांनी कधीही हयगय केली नाही.

आजच्या शिक्षण पद्धतीत असे शिक्षक ज्यांना ज्यांना भेटतात त्यांचे आयुष्य तर होतेच पण असे विद्यार्थी समाजासाठी धडपडणारी व्यक्तिमत्वे म्हणून प्रसिद्ध पावतात. निवडणूकीच्या निमित्ताने मला डॉ. निशिकांत श्रोत्री भेटले आणि

आनंदाची एक लहर मला देऊन गेले. त्यांनी धन येती भरूनी या त्यांच्या कवितेत लिहिलेल्या ओळींचा साधारण अर्थ असा आहे कि, समाजात जगत असताना काही व्यक्ती कर्तव्य, कर्मयोग मनापासून पार पाडतात. किंबहुना देदीप्यमान जीवितकार्य हेच त्यांचे जीवन ध्येय बनते. अशा वेळी व्यक्ती जर उच्च विद्या विभूषित असेल तर त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढते. खरं तर ते ही गोष्ट सजगतेने जाणीवपूर्वक करतात. शिक्षणाचे महत्व त्यांच्या सर्व साहित्यातून ते समाजापर्यंत पोहचवत आहेत. समाजामधील सर्व स्तरातील लोकांना प्रत्यक्ष भेटणे आपल्याला जगण्याची वेगळी दृष्टी देऊन जाते.

शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

गौरव मराठी भाषेचा

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

मराठी असे आमची मायबोली
जरी भिन्न धर्म धर्मानुयायी असू
पुरी बाणली बंधुता अंतरंगी
हिच्या एक ताटात आम्ही बसू.

हे माधव ज्युलियन यांचे स्फूर्ती गीत आजही प्रेरणादायी आहे.परंतु वस्तुस्थिती अशी की, एका बाजूला मराठी पुस्तके वाचणारा वाचक कमी होत चालला आहे. अशा परिस्थितीत त्या मराठीची जपणूक करण्याची, जिथे जिथे शक्य आहे तिथे माथ्यावर घेऊन ही भाषा अभिमानाने मिरवण्याची, या भाषेच्या विस्ताराची, विकासाची आणि प्रगतीची सर्वार्थाने जबाबदारी आपल्या साऱ्यांची आहे. ज्या मराठी भाषेचा कंठरवाने आपण गौरव करून मोकळे होऊन जातो, त्याच भाषेच्या अस्तित्व आणि भवितव्याबाबत चिंता करावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच आता समस्त मराठी भाषकांनी मिळून आत्मचिंतन करण्याची गरज आहे. मराठीच्या संवर्धनात माझी भूमिका आणि जबाबदारी काय आहे हे प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवे.

मराठी भाषेवरील प्रेम हे देवघरातील समय सारखं तेवत ठेवलं पाहिजे असे कुसुमाग्रज म्हणायचे ते उगीच नाही. कुसुमाग्रजांनी स्वातंत्र्य देवतेच्या विनवणीतून जे मांडले आहे ते लक्षात घेतले तर पुढे काही वेगळे सांगण्याची गरज भासत नाही.

भाषा मरता देशही मरतो
संस्कृतीचा ही दिवा विझे
गुलाम भाषिक होऊनी
प्रगतीचे शीर कापू नका

आधुनिक काळात शिक्षणाचे माध्यम बोली प्रकाशित साहित्य कोश व्याकरण आधी घटक भाषे संदर्भात महत्त्वाचे असतानाच महाजाल(इंटरनेट), संगणक ब्लॉक लेखन, फेसबुक आदि माध्यमातून भाषेचा वापर वाढत आहे. एकीकडे मराठीचा उत्सव साजरा करायचा व दुसरीकडे इंग्रजीचा वापर करायचा अशा धोरणामुळे भाषेच्या विकासावर मर्यादा येत असल्याचेही वास्तव आहे.

जागतिकीकरणामुळे इंग्रजीचे प्रस्थ वाढले असल्याने काही भाषा कालबाह्य होत आहे. शतकाच्या अखेरपर्यंत सुमारे ५० % म्हणजेच ३५०० भाषा मृतप्राय होतील. परिणामी दोन आठवड्याला एका भाषेचा मृत्यू घडत असल्याचा निष्कर्ष नॅशनल जिओग्राफिक सोसायटीने काढला असताना सोपस्कार पार पाडण्यापेक्षा मराठीला जागतिक स्थान कसे मिळेल याचा विचार व्हावा हीच अपेक्षा.



डॉ. अपेक्षा नाकतोडे
मराठी विभाग
बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी.
मोबाईल नंबर - 7387340467

कुसुमाग्रजांचा जन्मदिवस आपण मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याचा शासन निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला. या दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व विविध उपक्रमांतर्गत मराठी भाषा विकास व संवर्धनाच्या दृष्टीने विविध अंगी उपक्रम राबवले जात आहेत.

आधुनिक काळात कोणतीही भाषा टिकवण्यासाठी आणि विस्तारण्यासाठी त्या भाषेचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे माध्यम बोली, प्रकाशित साहित्य कोश, व्याकरण, सार्वजनिक वापर इत्यादी घटक भाषे संदर्भात महत्त्वाचे आहेतच. त्याचबरोबर भाषेचा संगणकावर आणि इंटरनेटवर होणारा वापर हा आजच्या युगात सर्वाधिक महत्त्वाचा घटक ठरतो आहे. यावरच भाषेचा विस्तार आणि विकास मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील प्रत्येकाने (इंटरनेटवर) महाजालावर मराठीचा वापर वाढवण्याचा आणि प्रत्येक संगणकावर युनिकोड प्रणित मराठी कार्यान्वित करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात समाज माध्यमांवर ई-मेल, ब्लॉग लेखन, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप इत्यादी माध्यमातून मराठीचा वापर वाढतो आहे. परंतु या वापराचा वेग आणि व्यक्ती वाढणे गरजेचे आहे. तरच आपण मराठी भाषेला जिवंत ठेवू शकू.

रत्नजडित अभंग, ओवी
अमृताची सखी
चारी वर्णातूनी फिरे
सरस्वतीची पालखी

हे भाषेचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी आज राजभाषा दिनानिमित्त आपण सर्वांनी मराठी भाषा वाचवण्याचा, भाषेचे संवर्धन व विकास करण्याचा संकल्प करूया.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559